दि ३१.३.२०१२ ते ३१.३.२०१८ पावेतो बँकेने केलेल्या प्रगतीचा थोडक्यात अहवाल खालील प्रमाणे आहेः–

| विवरण | दि. ३१.३.२०१२ ते ३१.३.२०१८ हया सात वर्षातील बँकेच्या प्रगतीची वाटचाल (रू.लाखात) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३१.३.२०१२ | ३१.३.२०१३ | ३१.३.२०१४ | ३१.३.२०१५ | ३१.३.२०१६ | ३१.३.२०१७ | ३१.३.२०१८ |
| भाग भांडवल | १३५५.४८ | १५१४.९७ | १८३५.१२ | २१६४.२८ | २३१६.५६ | २७७७.५७ | ३२०४.१२ |
| राखीव व इतर निधी | २७५९.४८ | २९५८.८५ | ३४२३.०८ | ३७६४.८६ | ४२९८.०४ | ५९३०.०७ | ७०६४.९४ |
| नेटवर्थ | ३३४०.२८ | ३६८१.२३ | ३८७९.४७ | ४७८०.९६ | ५३१५.२० | ६४७२.३६ | ७६६८.८५ |
| एकुण ठेवी | ४११६५.०० | ४६९२१.६३ | ५३९०६.४० | ६२१३९.३८ | ७१३१८.२३ | ८२८०५.६८ | १०११७७.३६ |
| दिलेली कर्जे | २६३४१.५० | २८३३९.४५ | ३५४१९.१८ | ४२६१२.८६ | ४६०८६.०० | ५६८३८.८२ | ६७५००.१४ |
| नफा | २८२.२१ | ३३७.५६ | ३४३.०९ | ५२४.७४ | ६१४.३८ | ५२३.७२ | ६०७.२२ |
| एन पी ए ग्रॉस | ५.८६% | ६.१७% | ४.८६% | ४.७७% | २.८५% | ६.४२% | ६.९८% |
| एन पी ए नेट | १.२७% | १.८१% | १.९८% | २.३८% | ०.३८% | ४.३३% | ४.५९% |
| खेळते भांडवल | ४७७३७.२८ | ५४४०५.३० | ६२००३.७९ | ७१४०२.७३ | ८१६४९.१२ | १०१४५९.४८ | ११६२०९.४८ |
| सी आर ए आर | १३.५६% | १३.२०% | १२.२७% | १२.४२% | १२.५१% | १३.१०% | १२.४१% |
| सभासद | २३४४२ | २४७१० | २८८८० | ३०३०० | ३१३७१ | ३४१६२ | ३७६८१ |

विपरीत नैसर्गिक परिस्थीती व आयकर विभागाने लादलेल्या जाचक अटी अशा जिवघेण्या अडचणीतही बँकेच्या सभासद, ग्राहक व ठेवीदारांनी बँकेवर दाखवलेल्या विश्वासामुळे आपल्या बँकेने प्रगतीचा वेग कायम ठेवला आहे.

तत्पर सेवा आणि प्रगत बँकिंगचा अवलंब केल्यामुळे अधिकाधिक ग्राहक आपल्या बँकेकडे वळत आहेत.या ग्राहकांना आधुनिक सेवांचा लाभ घेता यावा म्हणून बँक सतत नवनवीन पावले उचलत असते. याच मालिकेत आपली बँक मोबाईल बँकिंग ॲप घेऊन आली आहे. त्यामुळे आता वर्षातील ३६५ दिवस २४ तास अखंडितपणे बँकेच्या ग्राहकांना आपले व्यवहार विनाविलंब व सुलभतेने करता येतील. या सुविधेचा प्रत्येक खातेदाराने लाभ घ्यावा व या द्वारे आपले व्यवहार करून मा.पंतप्रधानांच्या कॅशलेस व डिजिटल इंडिया कार्यक्रमाला हातभार लावावा असे आवाहन मी करतो.